RNI No. MAHBIL /2009/35530

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार

वर्ष २, अंक १५] सोमवार, एप्रिल ११, २०१६/चैत्र २२, शके १९३८ [पृष्ठे ३, किंमत : रुपये २३.००

**असाधारण क्रमांक १७**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम.**

**अनुक्रमणिका**

| | |
|---|---|
| **सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११.**—महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम. .. .. .. | पृष्ठे १-३ |

दिनांक ७ एप्रिल २०१६ रोजी मा. राज्यपालांनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रकाश हिं. माळी,**
सचिव,
महाराष्ट्र शासन,
विधि व न्याय विभाग.

---

**सन २०१६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ११.**

(माननीय राज्यपालांची संमती मिळाल्यानंतर **"महाराष्ट्र शासन राजपत्रात"** दिनांक ११ एप्रिल २०१६ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

१९६६ चा महा. ४१. २०१६ चा महा. अध्या. ३. **आणि ज्याअर्थी,** यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ यात आणखी सुधारणा करण्यासाठी महाराष्ट्राच्या राज्यपालांनी तात्काळ कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून, त्यांनी दिनांक ५ फेब्रुवारी २०१६ रोजी महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अध्यादेश, २०१६, प्रख्यापित केला होता ;

**आणि ज्याअर्थी,** उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; **त्याअर्थी,** भारतीय गणराज्याच्या सदुसष्टाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

**१.** (१) या अधिनियमास, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अधिनियम, २०१६ असे म्हणावे. संक्षिप्त नाव व प्रारंभ.

(२) तो, दिनांक ५ फेब्रुवारी २०१६ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम २५५ ची सुधारणा.

**२.** महाराष्ट्र जमीन महसूल संहिता, १९६६ (यात यापुढे ज्याचा निर्देश " उक्त संहिता " असा केलेला आहे) याच्या कलम २५५ मध्ये, पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलमे समाविष्ट करण्यात येतील :— १९६६ चा महा. ४१.

"(४) कोणत्याही महसूल किंवा भू-मापन अधिकाऱ्यापुढे दाखल केलेले कोणतेही अपील, ज्या दिनांकास असे अपील दाखल केले असेल त्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीच्या आत निकालात काढण्यात येईल :

परंतु, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अधिनियम, २०१६ याच्या प्रारंभाच्या दिनांकापूर्वी दाखल केलेले असे कोणतेही अपील, अशा प्रारंभाच्या दिनांकापासून एक वर्षाच्या कालावधीच्या आत निकालात काढण्यात येईल : २०१६ चा महा. ११.

परंतु आणखी असे की, राज्य शासनास, किंवा जो अपील प्राधिकाऱ्यास वरिष्ठ असेल अशा, त्याबाबतीत पदनिर्देशित केलेल्या जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्यास, असे कोणतेही अपील निकालात काढण्यासाठी अपवादात्मक परिस्थितीत, कारणे लेखी नमूद करून, आणखी सहा महिन्यांचा कालावधी वाढवून देता येईल.

(५) जर अपील प्राधिकारी, पोट-कलम (४) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत कोणतेही अपील पुरेशा कारणाशिवाय निकालात काढण्यात कसूर करील तर, तो, त्यास लागू असलेल्या संबंधित शिस्तभंगविषयक नियमांनुसार शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरेल.".

सन १९६६ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ४१ याच्या कलम २५७ ची सुधारणा.

**३.** उक्त संहितेच्या कलम २५७ मध्ये,—

(क) पोट-कलम (१) मध्ये, पुढील परंतुक जादा दाखल करण्यात येईल :—

" परंतु, दुय्यम अधिकाऱ्याच्या निर्णयाच्या किंवा आदेशाच्या दिनांकापासून पाच वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यानंतर, कोणत्याही महसूल किंवा भू-मापन अधिकाऱ्याकडून या पोट-कलमाअन्वये किंवा पोट-कलम (२) अन्वये अशी कोणतीही कार्यवाही सुरू करण्यात येणार नाही. ";

(ख) पोट-कलम (३) मध्ये,—

(एक) पहिल्या परंतुकाच्या अगोदर, पुढील परंतुके समाविष्ट करण्यात येतील :—

" परंतु, कोणत्याही महसूल किंवा भू-मापन अधिकाऱ्यापुढे दाखल केलेली कोणतीही कार्यवाही ही, ज्या दिनांकास अशी कार्यवाही दाखल केली असेल त्या दिनांकापासून एका वर्षाच्या कालावधीच्या आत निकालात काढण्यात येईल :

परंतु आणखी असे की, महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अधिनियम, २०१६ याच्या प्रारंभाच्या दिनांकास, कोणत्याही महसूल किंवा भू-मापन अधिकाऱ्यापुढे, या कलमाखालील कोणतीही प्रलंबित कार्यवाही ही, अशा प्रारंभाच्या दिनांकापासून एका वर्षाच्या कालावधीच्या आत निकालात काढण्यात येईल : २०१६ चा महा. ११.

परंतु तसेच, राज्य शासनास, किंवा जो पुनरीक्षण प्राधिकाऱ्यास वरिष्ठ असेल अशा, त्याबाबतीत पदनिर्देशित केलेल्या जिल्हाधिकाऱ्याच्या दर्जापेक्षा कमी दर्जा नसलेल्या अधिकाऱ्यास, अशी कोणतीही कार्यवाही निकालात काढण्यासाठी अपवादात्मक परिस्थितीत, कारणे लेखी नमूद करून, आणखी सहा महिन्यांचा कालावधी वाढवून देता येईल :

परंतु तसेच, जर पुनरीक्षण प्राधिकारी, पोट-कलम (३) मध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत अशी कोणतीही कार्यवाही, पुरेशा कारणाशिवाय, निकालात काढण्यात कसूर करील तर, तो, त्यास लागू असलेल्या संबंधित शिस्तभंगविषयक नियमांनुसार शिस्तभंगाच्या कारवाईस पात्र ठरेल : " ;

(दोन) पहिल्या परंतुकामध्ये, " परंतु " या मजकुराऐवजी " परंतु तसेच " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(तीन) दुसऱ्या परंतुकामध्ये, " परंतु आणखी असे की " या मजकुराऐवजी " परंतु तसेच " हा मजकूर दाखल करण्यात येईल ;

(ग) पोट-कलम (३) नंतर, पुढील पोट-कलम जादा दाखल करण्यात येईल :—

" (४) पोट-कलम (१) किंवा (२) मध्ये निर्दिष्ट केलेल्या कोणत्याही अधिकाऱ्याने त्यांअन्वये दिलेल्या आदेशावर पुनरीक्षण अनुज्ञेय असणार नाही ; परंतु, केवळ राज्य शासनाने, पोट-कलम (१) किंवा (२) अन्वये दिलेल्या अशा कोणत्याही आदेशात फेरफार करणे, त्याचे विलोपन करणे किंवा तो फिरवणे हे, कायदेशीर असेल.".

२०१६ चा महा. अध्या. ३.

सन २०१६ चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक ३ याचे निरसन व व्यावृत्ती.

**४.** (१) महाराष्ट्र जमीन महसूल संहिता (सुधारणा) अध्यादेश, २०१६, हा, याद्वारे निरसित करण्यात येत आहे.

(२) असे निरसन झाले असले तरी, उक्त अध्यादेशाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमान्वये करण्यात आलेली कोणतीही कृती किंवा कार्यवाही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश यांसह) ही, या अधिनियमाद्वारे सुधारणा करण्यात आलेल्या मुख्य अधिनियमाच्या संबंधित तरतुदींन्वये करण्यात आलेली कोणतीही कृती, कार्यवाही किंवा यथास्थिति, काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा दिलेला आदेश असल्याचे मानण्यात येईल.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.

RNI No. MAHENG/2009/35528

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग आठ

वर्ष २, अंक २४(३)] सोमवार, एप्रिल ११, २०१६/चैत्र २२, शके १९३८ [ पृष्ठे ३, किंमत : रुपये २७.००

असाधारण क्रमांक ३८

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम आणि विधि व न्याय विभागाकडून आलेली विधेयके (इंग्रजी अनुवाद).**

In pursuance of clause (3) of article 348 of the Constitution of India, the following translation in English of the Maharashtra Land Revenue Code (Amendment) Act, 2016 (Mah. Act No. XI of 2016), is hereby published under the authority of the Governor.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

PRAKASH H. MALI,
Secretary to Government,
Law and Judiciary Department.

---

## MAHARASHTRA ACT No. XI OF 2016.

(*First published, after having received the assent of the Governor in the "Maharashtra Government Gazette", on 11th April 2016*)

An Act further to amend the Maharashtra Land Revenue Code, 1966.

WHEREAS both Houses of the State Legislature were not in session;

AND WHEREAS the Governor of Maharashtra was satisfied that circumstances existed which rendered it necessary for him to take immediate action further to amend the Maharashtra Land Revenue Code, 1966, for the purposes hereinafter appearing; and, therefore, promulgated the Maharashtra Land Revenue Code (Amendment) Ordinance, 2016, on the 5th February 2016 ;

Mah. XLI of 1966.

Mah. Ord. III of 2016.

AND WHEREAS it is expedient to replace the said Ordinance by an Act of the State Legislature; it is hereby enacted in the Sixty-seventh Year of the Republic of India as follows :—

Short title and commencement.

**1.** (*1*) This Act may be called the Maharashtra Land Revenue Code (Amendment) Act, 2016.

(*2*) It shall be deemed to have come into force on the 5th February 2016.

Amendment of section 255 of Mah. XLI of 1966.

**2.** In section 255 of the Maharashtra Land Revenue Code, 1966 (hereinafter referred to as "the said Code"), after sub-section (*3*), the following sub-sections shall be inserted, namely :— Mah. XLI of 1966.

"*(4)* Any appeal filed before any revenue or survey officer shall be disposed of within a period of one year from the date on which such appeal is filed :

Provided that, any such appeal filed before the date of commencement of the Maharashtra Land Revenue Code (Amendment) Act, 2016 shall be disposed of within a period of one year from the date of such commencement : Mah. XI of 2016.

Provided further that, in exceptional circumstances, for reasons to be recorded in writing, the period for disposing of any appeal may be extended further by six months by the State Government or an officer not below the rank of Collector designated in this behalf who is superior to the appellate authority.

(*5*) If the appellate authority fails without sufficient cause, to dispose of any appeal within the period specified in sub-section *(4),* he shall be liable for disciplinary action in accordance with the concerned disciplinary rules applicable to him.".

Amendment of section 257 of Mah. XLI of 1966.

**3.** In section 257 of the said Code,—

(*a*) to sub-section (*1*), the following proviso shall be added, namely :–

"Provided that, no such proceedings under this sub-section or sub-section (*2*) shall be initiated by any revenue or survey officer after expiry of a period of five years from the date of decision or order of the sub-ordinate officer. " ;

*(b)* in sub-section *(3)*,—

(*i*) before the first proviso, the following provisos shall be inserted, namely :—

" Provided that, any proceeding brought before any revenue or survey officer shall be disposed of within a period of one year from the date on which such proceeding is filed :

Provided further that, any proceeding pending under this section, before any revenue or survey officer on the date of commencement of the Maharashtra Land Revenue Code (Amendment) Act, 2016, shall be disposed of within a period of one year from the date of such commencement : Mah. XI of 2016.

Provided also that, in exceptional circumstances, for reasons to be recorded in writing, the period for disposing of any such proceeding may be extended further by six months by the State Government or an officer not below the rank of Collector designated in this behalf who is superior to the revisional authority :

Provided also that, if the revisional authority fails to dispose of any such proceedings within the period specified in sub-section *(3),* without sufficient cause, then he shall be liable for disciplinary action in accordance with the concerned disciplinary rules applicable to him : " ;

*(ii)* in the first proviso, for the words "Provided that" the words "Provided also that" shall be substituted;

*(iii)* in the second proviso, for the words "Provided further that" the words "Provided also that" shall be substituted;

*(c)* after sub-section *(3),* the following sub-section shall be added, namely :—

"(*4*) Revision of an order issued under sub-section *(1)* or *(2)* by any officer referred to therein shall not be permissible ; but it shall be lawful for the State Government alone to modify, annul or reverse any such order issued under sub-section (*1*) or (*2*).".

Mah. Ord. III of 2016.

Repeal of Mah. Ord. III of 2016 and saving.

**4.** (*1*) The Maharashtra Land Revenue Code (Amendment) Ordinance, 2016, is hereby repealed.

(*2*) Notwithstanding such repeal, anything done or any action taken (including any notification or order issued) under the principal Act, as amended by the said Ordinance, shall be deemed to have been done, taken or issued, as the case may be, under the corresponding provisions of the principal Act, as amended by this Act.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004, EDITOR : SHRI PARSHURAM JAGANNATH GOSAVI.